● रविवार, दि. १३ ऑक्टोबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ८२ वा ● किमंत २ रुपये ● पाने
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

मोती तलाव येथे माता मुर्तींचे विसर्जन

## ढोल-ताशांच्या गजरात विसर्जन मिरवणूक

**जालना । प्रतिनिधी -** गेल्या नऊ दिवसांपासून विविध मंडळांच्यावतीने नवरात्रोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शनिवार (दि १२) रोजी शहरातून विसर्जन मिरवणुक काढण्यात आली. ढोल-ताशांचा गजर, फटाक्यांची आतिषबाजी, डिजेच्या दणदणाटाने शहरातील रस्त्या-रस्त्यावर दिसून आला. मोती तलाव येथे माता मुर्तींचे विर्सजन करण्यात आले. शहर महानगर पालिकेच्यावतीने विर्सजनाची तयारी करण्यात आली होती. तसेच पोलीस प्रशासनानेही तगडा बंदोबस्त ठेवला होता. विर्सजन मिरवणुक शांततेत पार पडली.

ढोल ताशांच्या गजरात तसेच फटाक्यांच्या आतषबाजीत विसर्जन मिरवणुकास सुरवात झाली आहे. नवरात्रोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केल्यानंतर श्री दुर्गामातेच्या मूर्तीचे विसर्जन करुन या उत्सवाची सांगता झाली. त्याअनुषंगाने शनिवार (दि.१२) रोजी सकाळपासून माता मुर्तीच्या विसर्जनासाठी महापालिकेच्या वतीने जय्यत तयारी करण्यात आली होती. विसर्जनासाठीसाठी नांदेड येथून गोदावरी जीवरक्षक दलाचे ४५ जवान बोलावण्यात आले होते. अग्निशमन दलाचे जवान सुध्दा दुर्गामाता विसर्जनासाठी तैनात असल्याची माहिती अग्निशमध दलाचे अधिकारी माधव पानपट्टे यांनी माध्यमांशी बोलतांना दिली.

विर्सजन ठिकाण मोती तलाव येथे चंदनझीरा पोलीस ठाण्याचे पोलीस



निरीक्षक सम्राटसिंग राजपूत, पोलीस उपनिरीक्षक सचिन सानप, उपनिरीक्षक शिंदे, उपनिरीक्षक स्कोट दादा यांच्यासह अग्निशमन दलाचे अधिकारी माधव पानपट्टे, स्वच्छता निरीक्षक पंडित पवार, शोएब खान, लोंढे इत्यादींसह पालिकेचे कर्मचारी व पोलीस कर्मचारी यांची मोठ्या संख्येने उपस्थित आहे.

त्याचप्रमाणे महानगरपालिकेचे स्वच्छता निरीक्षक व इतर कर्मचारी तसेच कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आलेला आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस प्रशासनाच्या वतीने शहरात ठिकठिकाणी पोलिसांच्या वतीने करडी नजर ठेवण्यात आलेली आहे.

## टेंभूर्णीसह परिसरातील वीज पुरवठा सुरळीत करण्याची मागणी

अन्यथा महावितरण कार्यालयाला टाळे ठोकणार - रामधन कळंबे

**दत्ता देशमुख**
**टेंभुर्णी -** जाफराबाद तालुक्यातील टेंभूर्णी सह परिसरात सतत वीजपुरवठा खंडित होत असून,आठ-आठ दहा-दहा तास दुरुस्ती व लोडशेडिंगच्या नावाखाली लाईट बंद केल्या जात आहे. वीज पुरवठा सुरळीत न केल्यास महवितरण कार्यालयाला कुलूप ठोक इशारा राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष रामधन कळंबे यांनी दिला आहे.याविषयी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे की टेंभूर्णी हे शहर या परिसरातील मोठी बाजार पेठ असुन येथे वेल्डिंग वर्कशॉप, आरामाशिन,पिठाची गिरणी, ऑनलाईन केंद्र,झेरॉक्स सह छोटे मोठे व्यावसायिक यामुळे त्रस्त आहे.तर शेतीचे देखील रब्बी हंगामाच्या दृष्टीने वीज पुरवठा सुरळीत असणे खूपच गरजेचा आहे.मात्र तसे न होता शेतीचा वीजपुरवठाही दुरुस्ती किंवा ओहर लोडच्या नावाखाली दिवस दिवस बंद असतो. काही फिडर तर एक दिवस चालू तर दुसऱ्या दिवसी बंद या पद्धतीने वीजपुरवठा केला जात असुन, काही वेळा तर दोन दोन दिवस पुरवठा बंदच असतो.खरीप हंगामातील पिके अती पावसामुळे वाया गेलेली असताना आता रब्बी पिकांच्या आशेवर शेतकरी जगत आहे.मात्र लाईटची ही परिस्थिती अशीच राहिली तर पुन्हा शेतकऱ्यांना आत्महत्या



केल्याशिवाय पर्याय शिल्लक दिसत नाही.तर वीजपुरवठा सुरळीत न देता महावितरण व शासन वीज बिल शून्यची घोषणा करून शेतकऱ्यांची दिशाभूल करत नाही ना असा प्रश्न उद्भवत आहे.
तर तत्काळ वीज पुरवठा सुरळीत न केल्यास या भागाचे लोकप्रतिनिधी माजी जिल्हा परिषद सदस्य,तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष रामधन पा कळंबे यांनी शहरातील व्यवसायिक, शेतकरी व शेकडो घरगुती वीज ग्राहक यांना सोबत घेऊन महावितरण कार्यालयाला टाळे ठोकण्याचा इशारा दिला आहे.

## २० कोटींच्या ९० विकास कामांचे आज भूमिपुजन

माजी राज्यमंत्री खोतकर यांच्या विशेष प्रयत्नाने निधी उपलब्ध

**जालना । प्रतिनिधी -** शिवसेना नेते तथा माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांच्या प्रयत्नातून जालना विधानसभा मतदार संघातील विविध विकास कामांसाठी मोठ्या प्रमाणात राज्य शासनाकडून निधी उपलब्ध झालेला आहे. या निधी अंतर्गत होणाऱ्या जालना महापालिका हद्दीतील विकास कामांचा रविवार (दि १३) रोजी जवळपास २० कोटी रुपयांच्या ९० विकास कामांचा भूमिपूजन कार्यक्रम अर्जुनराव खोतकर यांच्या शुभहस्ते होणार आहे .यावेळी युवासेनेचे सचिव अभिमन्यू खोतकर, जिल्हा संपर्क प्रमुख पंडितराव भुतेकर ,जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, शहर प्रमुख विष्णू पाचफुले, आत्मानंद भक्त, शिवसेनेचे शहर संघटक दिनेश भगत सहसंपर्कप्रमुख फिरोजलाला तांबोळी, आलम खान पठाण लोकमत, शेतकरी सेना जिल्हा प्रमुख डॉ.सुयोग कुलकर्णी,अल्पसंख्यांक विभागाचे जिल्हाप्रमुख जावेदभाई, दलित आघाडीचे एडवोकेट भास्कर मगरे ,युवा सेनेचे जिल्हाप्रमुख अमोल ठाकूर, शैलेश घुमारे, अजय कदम, युवा सेनेचे उपजिल्हाप्रमुख गणेश मोहिते ,उपजिल्हाप्रमुख संतोष मोहिते, गणेश सुपारकर , अल्पसंख्याक विभागाचे उपजिल्हाप्रमुख नजीर भाई शेख शहर प्रमुख जफर खान,महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख कालींदाताई ढगे ,सविता केवंडे ,यांच्यासह शहरातील नगरसेवक गोपी किसन गोगडे,निखिल पगारे ,किशोर पांगारकर, संतोष जांगडे, राहुल हिवराळे, विशाल बनकर, प्रताप भैय्या वर्मा, रमेश टेकूर, जयपाल वर्मा ,पांडुरंग शिंदे महमूद पैलवान ,शत्रु वर्मा, संताजी वाघमारे, राम सतकर,विजय जाधव, विभाग प्रमुख मनोज लाखोले, रत्नपारखे जगदीश, भरत कुसुंदल, **पान २ वर**

**युवा आदर्श**

**नवरंगी ...**

**नवरात्र नवरंगी**
**रोज वेगळी साडी**
**आज कोणता रंग**
**रंगात आली गाडी**
**नवरोबा खुशीत ये**
**पत्नीची लाडीगोडी**
**निमीत्त असो काही**
**वाढली संसार गोडी**
**चाट बसे खिशाला**
**आनंदी राहे बायडी**
**आवाका पाहूनमग**
**जो तो मारतो उडी**
**गरबा दांडिया चाले**
**जमली छान जोडी**
**मुक्तपणा दुःखातून**
**मजा गंमतही थोडी**
**गंभीर नको नेहमी**
**करा जराशी खोडी**
**संसाराचे प्रवाहात**
**सुखे वल्हवा होडी**
**निमीत्ते गरीबनारीस**
**द्य्यायची नवीनसाडी**
**भोजनदान भुकेल्या**
**टाळून अन्न नासाडी**

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांचे विशेष प्रयत्न

## परतुर विधानसभा मतदारसंघात सभामंडप सिमेंट रस्त्यासाठी ०५ कोटी रुपयांचा निधी मंजूर

**परतूर । प्रतिनिधी -** भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेअंतर्गत नागरी व ग्रामीण क्षेत्रातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्त्यांचा गावांचा विकास करण्यासाठी माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या विशेष प्रयत्नांमधून परतूर मंठा जालना ग्रामीण मधील नेर शेवली भागातील ४६ गावांसाठी ०५ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला असल्याची माहिती माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी दिलेल्या पत्रकात म्हटले आहे

पुढे या पत्रकात म्हटले आहे की दलित वस्त्यांचा विकास व्हावा यासाठी आपण नियमित प्रयत्नशील राहिलो असून, मागील सहा महिन्यापूर्वी परतूर मंठा विधानसभा मतदारसंघांमध्ये दलित वस्त्यांसाठी ५० सभामंडपांसाठी निधी आपण खेचून आणला होता त्याच पार्श्वभूमीवर मतदार संघातील दलित वस्त्यांसाठी हा ०५ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला असल्याचे त्यांनी पत्रकात नमूद केले आहे

निधी मिळालेल्या गावांची नावे परतुर तालुक्यातील आष्टी तालुका परतूर येथे सभा मंडप बांधकाम करणे २० लक्ष खांडवी येथे सभा मंडप बांधकाम करणे १० लक्ष, खांडवी वाडी समाज मंदिर १० लक्ष वलखेड समाज मंदिर १० लक्ष , दैठणा बुद्रुक सभा मंडप १० लक्ष माव सभा मंडप १० लक्ष, शेलगाव सभा मंडप १० लक्ष , राणी वाहेगाव सभा मंडप १० लक्ष, लिंगसा सभा मंडप १० लक्ष, शिरसगाव सभा मंडप १० लक्ष सातोना खुर्द सभा मंडप १० लक्ष, कारळा सभा मंडप १० लक्ष वैजोडा सभा मंडप १० लक्ष, लोणी येथे सिमेंट रस्ता बांधकाम करणे २० लक्ष पांडे पोखरी सिमेंट रस्ता १०लक्ष , आंबा सिमेंट रस्ता १० लक्ष , शेवगा सिमेंट रस्ता १० लक्ष, बाबुल तारा सिमेंट रस्ता १० लक्ष, दैठना खुर्द सिमेंट रस्ता १० लक्ष, खडकी सिमेंट रस्ता १० लक्ष, नांद्रा सिमेंट रस्ता १० लक्ष गोळेगाव सिमेंट रस्ता १० लक्ष शिंगोना सिमेंट रस्ता १० लक्ष तर मंठा तालुक्यातील मंठा शहरांमध्ये सभामंडप २० लक्ष, शिवनगिरी सभा मंडप १० लक्ष, पाटोदा सिमेंट रस्ता १० लक्ष विडोळी सिमेंट रस्ता १० लक्ष गेवराई सिमेंट रस्ता १०लक्ष हेलस सिमेंट रस्ता २० लक्ष, उमरखेडा सिमेंट रस्ता १०लक्ष कीर्तापूर सिमेंट रस्ता १० लक्ष देवठाणा सिमेंट रस्ता १० लक्ष, तळणी सिमेंट रस्ता १० लक्ष, पांगरी गोसावी सिमेंट रस्ता १० लक्ष , वाई सिमेंट रस्ता १० लक्ष देवगाव खवणे सिमेंट रस्ता १० लक्ष पांडुरना सिमेंट रस्ता १० लक्ष सावरगाव सिमेंट रस्ता १० लक्ष, भुवन सिमेंट रस्ता १० लक्ष,



तर जालना तालुक्यातील नेर शेवली भागातील पिंपळवाडी येथे सभा मंडप १० लक्ष रुपये, शेवली सभा मंडप १०लक्ष , कोळवाडी सभा मंडप १०लक्ष , ढगी सभा मंडप १० लक्ष, सेवली सिमेंट रस्ता १० लक्ष, कोळवाडी सिमेंट रस्ता १० लक्ष बोरगाव सिमेंट रस्ता १० लक्ष आदी ४६ गावांमध्ये पाच कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला असल्याचे माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी प्रसिद्धी दिलेल्या पत्रकात म्हटले आहे

## परतूरात प्रतिकात्मक रावण दहण उत्साहात

**परतूर । प्रतिनिधी -** परतूर येथील दसरा उत्सव समितीच्या वतीने आज दिनांक १२ रोजी परतूरात वाईट विचाराच्या रावण प्रतिकात्मक ३१ फुटी प्रतिमेचे दहण करण्यात आले. येथील साईनाथ मंदिराच्या परिसरात विजयादशमी निमित्त सायंकाळी ६:४५वाजता संपन्न झालेल्या या पारंपरीक कार्यक्रमात, माजी मंत्री आ बबनराव लोणीकर, मा आ सुरेशकुमार जेथलिया, बागेश्वरी साखर कारखाना



चेयरमन शिवाजी जाधव, कपिलभैय्या आकात, शिवसेना जिल्हाप्रमुख ए जे बोराडे, नितीनकुमार जेथलिया, मोहन अग्रवाल, दसरा उच्छव समितीचे राजकुमार भरूका, अजय देसाई, कैलास सोळंके, माणिक जैस्वाल, काँग्रेस नेते बालासाहेब आकात, विनायक काळे, , रामेश्वर नळगे, विजय राखे, माधवराव कदम, वैजनाथ बागल, राजेभाऊ पवार, गणेश पवार, संदीप बाहेकर, परेश पाटीलसह अनेक मान्यवाराच्या उपस्तिती होती.

यावेळी वाईट विचाराच्या तब्बल ३१ फुटी प्रतिमेचे दहन करण्यात आले. गेल्या २७ वर्षा पासून दसरा उत्सव समितीच्या पुढकाराने सदरील कार्यक्रम प्रति वर्षी अविरत चालू असून विजयादशमी निमित्त सिमोलंगनासाठी या परिसरात नागरिक, महिला, आवाल वृद्ध, लहान मुले गोळा झाले होते.अक्षरशः या परिसराला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते . नयनरम्य फटाक्याची आताशीबाजी व नयनरम्य विविध रंग उधळणारी फुल फटाक्यांनी हा परिसर दानाणून गेला होता. यंदा या कार्यक्रमात आणखीनच बहर आणत दसरा समितीच्या वतीने दहा फुटी हुमानाचा वेश **पान २ वर**



## संपादकीय

# आचारसंहितेपुर्वी प्रश्न सोडवा अन्यथा उखडून टाकू - मनोज जरांगे

### नारायणगडावर दसरा मेळावा

**बीड । प्रतिनिधी** - आचार संहितेपूर्वी राज्यातील शेतकरी, मराठा आरक्षण, व ईतर सर्व समाजाच्या प्रश्न सोडवा अन्यथा सरकार, ओय सरकार सुट्टी नाय म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी दंड थोपटले आहे. या सरकारने मराठा समाजाच्या नाक्कावर टिच्चून निर्णय घेतले आहेत. आता निर्णय घेतला नाही तर त्यांच्या नाकावर टिच्चून आम्ही निर्णय घेऊ, उखडून टाकू.

शनिवार (दि. १२) रोजी शिरूर तालुक्यातील नारायण गडावर दसरा मेळावा आयोजित करण्यात आला होता. या ठिकाणाहून मनोज जरांगे यांनी राज्यातील शेतकरी, समाजबांधवांना संबोधित केले. यावेळी गडावरील महंत शिवाजी महाराज यांच्यासह कोटींच्या संख्येने समाज बांधवांची उपस्थिती होती.

जरांगे पाटील म्हणाले की, राज्यात शेतकऱ्यांचे प्रश्न आहे. त्यांना पीकविमा नाही, मराठा आरक्षण प्रश्न आहे, महादेव कोळी, बंजारा, मुस्लिम, अनुसूचित जाती जमाती सह अठरा पगड जातींना दिलं जात नाही, या सरकारने आचार संहिता लागू होण्यापूर्वी राज्यातील सर्व प्रश्न सोडवावे, अन् अन्यथा आचार संहिता लागू झाल्यानंतर निर्णय घेऊ असेही जरांगे पाटील म्हणाले.

मराठा समाजाची अडवणूक होत आहे, अशी अडवणूक होणार असेल तर इच्छा नसतांनाही उठाव करावा लागेल. अन्यायाविरोधात लढा देण्याची शिकवण ही संतांनी दिली, वारकऱ्यांनी दिली, कायदा व संविधानाने दिली आहे. राज्यासाठी समाजाने झटला आहे. स्वतः च्या हातात तलवार घेऊन समाज लढला आहे.

आमचा दोष काय आहे हे कुणालाच सांगता येत नाही, आपल्याला डावललं जातंय, टार्गेट केलं जातंय, मागं काय झालं हे त्यांना कळलं असेल. उलथा पालथ करावीच लागेल.

तुमचे हित चोरून काम करणार नाही तुमच्या पुढे जाणार नाही असा शब्द समाजाला देत जरांगे पाटील यांनी समाजाकडून वचन घेतलं, जे ठरवल तेच करायचे, स्वहित बाजूला ठेवा, पक्ष पक्ष, नेता, नेता करू नका, आपल्या मुलांच्या भवितव्याचा विचार करा.



उपस्थित समुदायाने ठरलं तेच करू यावर होकार्थी हात उंचाविल्यानंतर जरांगे यांनी आता दाखवतो सरकारला कचका म्हणत आचार संहिता लागू झाल्यानंतर निर्णय घेण्यात येणार असल्याचे सांगितले.

**आरक्षणात येऊ नका म्हणणारे कुठंय**


या सरकारने १७ जाती आरक्षणात घेतल्या आहेत, आता ते आरक्षणात येऊ नका म्हणणारे कुठंय असा प्रश्न उपस्थित करत, आता त्यांच्या आरक्षणाला धक्का लागला नाही का? केवळ मराठ्यांचा द्वेष करत आहे.

**देवेंद्र फडणवीस यांचा घेतला समाचार**

आरक्षण पाहिजे असेल तर महाविकास आघाडी कडून लिहून घ्या असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हंटले होते याचा समाचार जरांगे पाटील यांनी घेतला. १७ जातींना आरक्षण दिले तेंव्हा काय महाविकास आघाडी कडून लिहून घेतले का? असा प्रश्न फडणवीसांना विचारला आहे.

# चित्रपट सृष्टीतील अवलिया अष्टपैलू

हिंदी चित्रपट सृष्टीतील अवलिया व्यक्तिमत्त्व असलेले किशोर कुमार यांचा आज स्मृतिदिन. आजच्याच दिवशी म्हणजे १३ ऑक्टोबर १९८७ रोजी किशोर कुमार यांचे निधन झाले. किशोर कुमार हे हिंदी चित्रपट सृष्टीला लाभलेले अनमोल रत्न आहे. चित्रपट निर्मितीतील असे कोणतेच क्षेत्र नाही की ज्यात त्यांचा सहभाग नाही. पार्श्वगायक, संगीतकार, गीतकार, निर्माता, दिग्दर्शक, अभिनेता, पटकथा लेखक असे चित्रपट निर्मितीतील सर्वच प्रकारात त्यांनी मुक्त विहार केला. किशोर कुमार यांचे मूळ नाव आभास कुमार गांगुली असे होते. ४ ऑगस्ट १९२९ रोजी मध्यप्रदेशातील खांडवा येथे किशोर कुमार यांचा जन्म झाला. त्यांचे वडील कुंजलाल गांगुली हे वकील होते तर आई गौरादेवी या गृहिणी होत्या. त्यांचे थोरले बंधू अशोक कुमार आणि अनुप कुमार हे दोघेही हिंदी चित्रपट सृष्टीत नायक म्हणून कार्यरत होते. किशोर कुमार हे देखील आपल्या भावांप्रमाणे चित्रपट सृष्टीत नशीब आजमावण्यासाठी धडपडत होते. १९५० साली कुंजलाल गांगुली यांनी किशोर कुमार यांना मुक्कदर या चित्रपटात काम दिले. १९५२ ते १९६० या दरम्यान किशोर कुमार यांनी बऱ्याच चित्रपटात काम केले. नोकरी, अधिकार, धोबी डॉक्टर, ईलजाम, मिस माला, झलक हे चित्रपट त्यांनी १९५४ या एकाच वर्षात पूर्ण केले. १९५६ साली तर त्यांनी ९ चित्रपटात भूमिका केल्या. हा त्याकाळी एक विक्रम होता. त्यानंतर ते अभिनयासाठी गायनही करु लागले. अभिनय आणि गायन असा त्यांचा समांतर प्रवास सुरू झाला. किशोर कुमार यांनी आपल्या मिश्किल स्वभावाने चित्रपट सृष्टीत विनोदी भूमिकांचा नवा ट्रेंड आणला. अभिनय करताना गायन आणि संगीताचा तालावर थिरकने असा नवा ट्रेंड त्यांनी सुरू केला. किशोर कुमार यांच्या या नवीन स्टाईलने तरुणांना भुरळ घातली. त्याकाळातील सर्व दिग्गज नायिकांसोबत त्यांनी भूमिका केल्या. मधुबाला सोबत त्यांची जोडी विशेष जमली. अभिनयासोबत गायनातही ते यशस्वी होऊ लागले. त्यांची गाणी लोकप्रिय होऊ लागली. किशोर कुमार यांना संगीतकार सचिन देव बर्मन यांनी अनेक संधी दिल्या. सचिन देव बर्मन यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली त्यांनी गायलेली सर्व गाणी लोकप्रिय झाली. पुढे सचिन देव बर्मन यांचे चिरंजीव राहुल देव बर्मन उर्फ पंचमदा यांच्याशी जोडी जमली या जोडीने अनेक लोकप्रिय गाणी चित्रपट सृष्टीला दिली. लता मंगेशकर आणि आशा भोसले यांच्यासोबत त्यांनी शेकडो गाणी गायली ती सर्व लोकप्रिय झाली. किशोर कुमार यांनी तीन दशकांहून आधीक काळ गायन केले. देव आनंद यांच्यापासून अनिल कपूर यांच्यापर्यंत सर्वच नायकांना त्यांनी आवाज दिला. किशोर कुमार यांचा आवाज ज्या नायकासाठी वापरला गेला तो नायक स्टार बनला. राजेश खन्ना यांना बॉलिवूडचा सुपरस्टार बनवण्यामागे किशोर कुमार यांचाही मोठा हात आहे. राजेश खन्ना यांच्या सर्व चित्रपटांमध्ये किशोर यांचाच आवाज वापरला गेला. आराधना पासून जमलेल्या या जोडीने पुढे इतिहास घडवला. या जोडीची सर्व गाणी हिट झाली. ज्या ज्या वेळी राजेश खन्ना यांचे नाव निघते त्या त्या वेळी किशोर कुमार यांचेही नाव घेतले जाते. किशोर कुमार यांनी ४०० हुन अधिक चित्रपटात शेकडो गाणी गायली ती सर्व लोकप्रिय झाली. नायक, गायक यासोबत ते दिग्दर्शकही होते. चलती का नाम गाडी यासारख्या विनोदी चित्रपटसोबतच दूर गगन की छाव मे यासारखा गंभीर चित्रपटही त्यांनी काढला. त्यांनी काही चित्रपटांना संगीतही दिले तर काही चित्रपटांसाठी गाणीही लिहिली. किशोर कुमार यांनी चित्रपटाच्या पटकथाही लिहील्या. असा हा हिंदी चित्रपट सृष्टीतील अवलिया अष्टपैलू १३ ऑक्टोबर १९८७ रोजी जगाला अलविदा करून कायमचा निघून गेला. किशोर कुमार यांच्या जादुई आवाजाची मोहिनी आजही कायम आहे. आजही त्यांची गाणी पूर्वीइतकीच लोकप्रिय आहेत. किशोर कुमार यांनी चित्रपट सृष्टीवर असा ठसा उमटवला आहे की त्यांच्या नावाशिवाय हिंदी चित्रपट सृष्टीचा इतिहास पूर्ण होऊ शकत नाही. किशोर कुमार यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!



**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## जिल्ह्यातील ६ शेतकऱ्यांना पुरस्कार वितरीत

**जालना -** महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या वर्ष- २०२३ करीता कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या व्यक्ती, गट, संस्थांनी विविध कृषी पुरस्कारासाठी संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाकडे बुधवार दि.३० ऑक्टोबर २०२४ पर्यंत प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे. कृषी विभागाकडून वर्ष २०२०, २०२१ आणि २०२२ वर्षासाठी जिल्ह्यातील पुरस्कार प्राप्त एकुण ६ शेतकऱ्यांना राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते नॅशनल स्पोर्टस क्लब ऑफ इंडिया मुंबई येथे स्मृतिचिन्ह व सन्मानचिन्ह देवून सपत्नीक सत्कार करण्यात आला. यामध्ये वर्ष २०२० चा वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार बाजी उम्रद येथील श्रीकृष्ण नामदेव डोंगरे, उद्यान पंडित पुरस्कार रामेश्वर भगवान उबाळे, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ पुरस्कार कर्जत येथील पांडूरंग निवृत्ती डोंगरे यांना देण्यात आला. वर्ष २०२१ चा वसंतराव नाईक शेतीनिष्ठ पुरस्कार ठोलेवाडी येथील उदलसिंग सुखलाल चुंगडे यांना तसेच वर्ष २०२२चा खेडगाव येथील श्रीमती सुचिता दत्तात्रय शिनगारे, भरडखेडा येथील रामदास शेषेराव बारगजे यांना देण्यात आला आहे. असे जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# अन्यथा पाचही विधानसभा मतदार संघात उमेदवार उभे करणार - ॲड. मगरे

### राजुरात दलित आदिवासी भुमिहिन कास्तकार, बेघर निराधारांचा मेळावा संपन्न

**राजुर । प्रतिनिधी -** राज्यात दलित आदिवासी भुमिहिन कास्तकारांचे अतिक्रमण नियमानुकूलित करुन सातबारा देण्याचे आदेश आहेत. मात्र प्रशासन, शासन निर्णयाची गांभीर्याने दखल घेत नसल्यामुळे राज्यात अनेक ठिकाणी दलित आदिवासी भुमिहिन कास्तकारांचे बळी गेले असल्याचे शिवसेना दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख तथा भुमिहिन कास्तकार, बेघरांचे नेते ॲड. भास्कर मगरे यांनी सांगितले.

राजुर, हसनाबाद, तळणी सर्कलचा ११ ऑक्टोंबर रोजी शिवसेना दलित आघाडीच्या वतीने दलित आदिवासी भुमिहिन कास्तकर, बेघर निराधारांच्या बदनापूर विधानसभा मतदार संघातील राजुर येथे मेळाव्यात ॲड. मगरे बोलत होते. यावेळी पुढे बोलतांना ॲड. भास्कर मगरे म्हणाले की, राज्यात दलित आदिवासी भुमिहिन कास्तकारांचे शेतीसाठी झालेले अतिक्रमण सन १९६८-६९ पासूनचे आहे. शासकीय पडीत जमीनीवर अतिक्रमण केल्यामुळे तत्कालीन महसूल कर्मचारी, अधिकार्यांनी अतिक्रमण धारकांच्या अतिक्रमणाचे पंचनामे करुन पोलीस कारवाई व न्यायालयीन प्रक्रियामध्ये तुरुंगवास झाला. शासन निर्णय २८ नोव्हेंबर १९९१ अधिनियम पारित झाला. त्यामध्ये १ एप्रिल १९७८ ते १४ एप्रिल १९९० च्या दरम्यान राज्यात दलित आदिवासी भुमिहिन कास्तकरांचे अतिक्रमण नियमानुकूलित करुन सातबारा देण्याचे आदेश आहेत. मात्र प्रशासन, शासन निर्णयाची गांभीर्याने दखल घेत नसल्यामुळे राज्यात अनेक ठिकाणी दलित आदिवासी भुमिहिन कास्तकरांचे बळी गेलेले आहेत. दलित

आदिवासी भुमिहिनांच्या सातबारा उतार्याला नाव नसल्याने बळी जात आहेत. मात्र शासन या विषयी प्रशासनाला जवाब विचारत नाही, कारण ज्यांनी विधी मंडळात विधायकाला पाठींबा देवून जिल्हा प्रशासनावर दबाव टाकण्याचे काम विधी मंडळ सदस्य करीत असल्याचे लक्षात आले आहे.

दलित आदिवासी नेते ॲड. भास्कर मगरे हे गेले अनेक वर्षांपासून दलित आदिवासी कास्तकारांचे सातबारा विषयक कायदेशिर आंदोलने, मोर्चे चालवित आहेत. मात्र सरकार घोषणा शिवाय पुढे जात नाही. या राज्यात दलित आदिवासीची उदरनिर्वाहाचे कास्तपट्टे नावे करुन सातबारा उतार्याला नोंद घ्यावी अन्यथा दलित आदिवासी नेते म्हणून मी यापुढे तीव्र आंदोलनाच्या तयारीत असल्याचा इशाराच दलित आदिवासी भुमिहिन कास्तकरांचे नेते ॲड. भास्कर मगरे यांनी या मेळाव्यातून दिला. आंदोलने करायची किती, प्रशासनाला विचारला प्रश्न शिवसेना दलित आघाडीच्या वतीने आघाडी सरकारपासून आंदोलनाच्या माध्यमातून रस्त्यावरचा संघर्ष करीत आहे. महायुती सरकारमध्ये सुध्दा दलित आदिवासी कास्तपट्टे नावे झाले नाहीत. शासन निर्णय २८ नोव्हेंबर १९९१ अधिनियम समोर

ठेवून सातबारा उतार्याला दलित आदिवासी कास कारांचे नावे घ्यावेत मात्र तसे होत नाही. दलित आदिवासी नेते ॲड. भास्कर मगरे यांनी दलित आदिवासी भुमिहिन जालना ते मुंबई लाँग मार्च काढला. २५ फेब्रुवारी २०१९ रोजी महायुतीचे सरकार होते. त्यानंतर ही अनेक आंदोलने झाली. मात्र प्रशासन आश्वासना शिवाय पुढे जात नाही. १७ मार्च २०२४ रोजी मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी विधी मंडळात शासन निर्णय २८ नोव्हेंबर १९९१ अधिनियमानुसार राज्यातील दलित आदिवासी भुमिहिन कास्तपट्टे नावे करुन सातबारा देण्याचे आदेश दिले. मात्र प्रशासकीय स्तरावर अंमलबजावणी होत नाही. आंदोलने करायची किती असा प्रश्न प्रशासनाला ॲड. मगरे यांनी राजुरातील मेळाव्यातून उपस्थित केला. अन्यथा पाचही विधानसभा मतदार संघात उमेदवार उभे करणार- ॲड.मगरे पुढे बोलतांना मगरे म्हणाले की, माझ्या गोर-गरीब भुमिहिन, बेघर, कास्तकरांना न्याय भेटत नसल्याने आम्ही न्याय पदरात पाडून घेण्यासाठी जालना जिल्ह्याला पाचही विधानसभा मतदार संघात उमेदवार उभे करणार असून बदनापूरमध्ये मी स्वतः उमेदवारी फॉर्म भरणार असल्याचे ॲड. भास्कर मगरे यांनी बोलून दाखवले. आहे. यावेळी तालुकाभरातून दलित आदिवासी भुमिहिन, बेघर, कास्तकरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



## नवरात्र उत्सवानिमित्त गीत गायन स्पर्धा संपन्न..!

**जालना । प्रतिनिधी -** येथील १०० शिक्षक समूहातर्फे नवरात्री उत्सवानिमिलत्त आयोजित नवरात्रोत्सवाचे नऊ शैक्षणिक उपक्रम सामाजिक परिवर्तनासाठी या अंतर्गत दिनांक ३ ऑक्टोबर रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, भिलपुरी (खुर्द) ता . जि. जालना येथे गीत गायन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत ४० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या स्पर्धेत छोट्या छोट्या मुलांनी नवरात्री उत्सवाचे महत्त्व विशद करणारी व सामाजिक परिवर्तनासाठी उपयुक्त ठरतील अशी गाणी सादर करून उपस्थितांची मने जिंकली. यात गुणानुक्रमे आलेल्या पहिल्या तीन स्पर्धकांना शैक्षणिक वस्तू, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले जाणार आहेत अशी माहिती स्पर्धा संयोजक श्री. रामेश्वर आंबेकर यांनी दिली. यावेळी श्रीमती जोशी, श्री प्रधान, श्री गायके यांची उपस्थिती होती तर परीक्षक म्हणून श्रीमती भिसे व गाडेकर यांनी परीक्षण केले.

पान १ वरुन

### २० कोटींच्या ...

मुसाफर्स वाले सखाराम लंके प्रदीप गायकवाड राजू गायकवाड राजू माधव आले, कांताराम रांजणकर ,लखन कनिसे, भोला कांबळे, सुशील भावसार, महेश दुसाने, कमलेश खरे, नरेश भैया खुदभैय,संजय गायकवाड ,दीपक राठोड, किशोर शिंदे, दादाराव पाचफुले, अंकुश पाचफुले,, सागर पाटील, शुभम टेकाळे, पीटर खंदारे ,राजू पवार, बाबुराव मामा जाधव, लक्ष्मण आप्पा अवघड, शिवाजी कोरे,बालाजी पवार, प्रकाश विटेकर, गणपतराव धोत्रे , जगदीश रत्नपारखे, शिवशंकर तिलवारवाले ,दीपक हवाले ,सुशील भावसार, बाळू भिसे , पिटर खंदारे, नेलसन कांबळे ,चंद्राच्या निर्मल, प्रदीप गायकवाड, स्वप्निल घुले, अक्षय कुलकर्णी, अरविंद भालेकर ,अभिषेक जोगदंड ,विक्रम कुसुंदल, सचिन सांबरे ,भूषण सांबरे, सुरेंद्र कावले, शिवाजी लाड,, कृष्णा मुळे ,गोपाल चौधरी, अक्षय भगत ताहेरखान, अभिषेक काबलीय, मनोज धानोरे ,भूषण बनकर,, शुभम घाटेकर, अमोल पाटील ,विकी क्षीरसागर ,राम भुरेवाल,राजु सरोदे, जनक भुरेवाल,प्रतीक काबलीये,प्रमोद पवार, राजीव गुजर, यश ठाकूर ,शंकर मोहिते ,अनिरुद्ध शेळके, अतुल ढवळे ,बबनराव मगरे, गणेश राऊत, संदीप वाघमारे, रितेश चौधरी, विनोद पाटील ,धनराज बटावले, अंकुश शितोळे, यांच्यासह शिवसेना युवा सेना ,दलित आघाडी सेना ,अल्पसंख्यांक सेना, शेतकरी सेना, सर्व संगीत संघटनेचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

### परतुरात प्रतिकात्मक ...

परिधान असलेल्या देखावा आयोजित केला होता यावेळी पंचक्रोशीत भक्तांनी, नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्तिती दर्शवली उपस्तिनाचे समितीचे राजकुमार भरूका, अजय देसाई, कैलास सोळंके, माणिक जैस्वाल यांनी आभार व्यक्त केले.

# शहर विकासासाठी केंद्र शासनाकडून निधी कमी पडू दिला जाणार नाही - रावसाहेब दानवे

## जालना शहरात विविध विकसकामांचे लोकार्पण

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहराच्या विकासासाठी राज्य व केंद्र शासनाकडून माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात निधी प्राप्त झालेला असून शहरातील पूर्ण झालेल्या विविध विकसकामांचे आज दि. १२ ऑक्टोबर रोजी लोकार्पण करण्यात आले.

यावेळी मा. श्री. रावसाहेब पाटील दानवे यांच्या विशेष प्रयत्नातून विशेष रस्ता योजना अंतर्गत काशी विश्वेश्वर मंदिर ते गोपीनाथ मुंढे चौकापर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम करण्यासाठी रु. २.00 कोटी, शिंदे बाल रुग्णालय ते कृष्णा ट्रॉली नवीन मोंढा पर्यंत रस्त्याचे बांधकाम करण्यासाठी रु. २.00 कोटी, तसेच जालना म.न.पा. हद्दीतील सिंधी पंचायत वाडा ते जवाहर बाग पर्यंत अंडरग्राऊंड ड्रेनेज, लादीकरणासह सी.सी. रस्ता बांधकाम करण्यासाठी रु. ३.00 कोटी, जालना म.न.पा. हद्दीतील जिजामाता प्रवेशद्वार ते बुंदीले चौकापर्यंत अंडरग्राऊंड ड्रेनेजसह लादीकरणासह सी.सी. रस्ता बांधकाम करण्यासाठी रु. ४.00 कोटी, जालना नगर परिषद हद्दीतील नूतन वसाहत येथे श्री मगरे टेलर कॉम्प्लेक्स ते ओव्हर ब्रीज व्हाया भीमराज गेट डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापर्यंत सी.सी. रस्ता तयार करण्यासाठी रु. ४.८२ कोटी

त्याचप्रमाणे जालना नगर परिषद अंतर्गत चमन ते स्वामी विवेकानंद पुतळ्यापर्यंत सिमेटरस्ता बांधकाम बांधकाम करण्यासाठी रु ६.00 कोटी, शहरातील चाटी गल्ली, फुल बाजार व कपडा बाजार येथे सि.सि. रोड, भुमीगत नाली व लादीकरण करण्यासाठी रु २.00 कोटी, पोलीस ट्राफिक ऑफिस ते देवचंद चत्रभुज पेट्रोल पंपापर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम करण्यासाठी रु २.00 कोटी

तसेच जालना म.न.पा. हद्दीतील शिंदे बालरुग्णालय ते बालाजी चौकापर्यंत काँक्रीट रस्त्याचे बाजुस दुतर्फा मजबुतीकरण, डांबरीकरण उर्वरीत सि.सि.नाली बांधकाम करण्यासाठी रू १७० लक्ष, कृष्णा ट्रॉली ते नरवय्ये यांच्या घरापर्यंत व्हाया वाघमोडे यांच्या घरापर्यंत सी.सी. रस्ता बांधकाम करण्यासाठी रू ७० लक्ष, योगेश नगर येथे सी.सी.रस्ता बांधकाम करण्यासाठी रू ३० लक्ष, सेंट मैरी हायस्कुल ते गायत्री नगर रस्त्यावरील सिना नदीवरील पुलाचे बांधकाम करण्यासाठी रू ७० लक्ष, दत्त नगर येथे सुरोसे यांच्या घराजवळील सी.सी.रस्ता बांधकाम व भुमीगत नालीचे बांधकाम करण्यासाठी रू ३५ लक्ष, गायत्री नगर येथे संजय पवार यांचे घर ते शितला माता मंदिर पर्यंत, प्रकाश यांचे घर ते पैठणकर यांचे घरापर्यंत सी.सी. रस्ता बांधकाम करण्यासाठी रू ६८ लक्ष, जिजामाता नगर येथे अभिन्यासातील मोकळीजागा विकसीत करण्यासाठी रू २५ लक्ष, गजानन नगर येथे टाकसाळ यांचे घर ते मोहिते यांचे घर, देवडे यांचे घर ते नानोटे यांचे घर, चव्हाण यांचे घर ते पाजगे यांच्या घरापर्यंत सी.सी. रस्ता बांधकाम करण्यासाठी रू २५ लक्ष, प्रभाग क्रमांक 0७ मधील मनिष नगर येथे राठी मार्बल ते चव्हाण यांच्या घरापर्यंत सी.सी. रस्ता व भुमीगत नालीचे बांधकाम करण्यासाठी रू १८ लक्ष, जांगडा नगर येथे संतोष नन्नावरे यांचे घर ते चौधरी यांच्या घरापर्यंत, वैष्णवी इंटरप्रायजेसते पारीख किराना पर्यंत सी.सी. रस्ता व भुमीगत नालीचे बांधकाम करण्यासाठी रू २५ लक्ष, गोपाळ नगर येथे मेन रोड कोठारी नगर ते म्हसलेकर यांचे घर व्हाया धनसिंग कनसे यांचेघर ते येऊल यांचेघर ते धनसिंग कनसे यांच्या घरापर्यंत सी.सी. रस्ता बांधकाम करण्यासाठी रू. २५ लक्ष, थाडेश्वर महादेव मंदिर परिसरात लादीकरण करणे बांधकाम करण्यासाठी रू १५ लक्ष व म ाऊलीनगर येथे सांगळे यांचे घर ते ढाकणे यांच्या घरापर्यंत सी.सी. रस्ता बांधकाम करण्यासाठी रू २५ लक्ष अश्या एकूण २२ कोटी पेक्षा अधिक रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे, यापुढेही जालना शहराच्या विकासासाठी केंद्र व राज्य शासनाकडून शहराच्या सर्वांगीण विकासासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही असे आश्वासन मा.रावसाहेब पाटील दानवे यांनी यावेळी दिले.



दादांच्या नेतृत्वात जालना जिल्ह्याला विकासाला नवसंजीवनी लाभली आहे. त्यांच्या माध्यमातून रेल्वे, रस्ते, शिक्षण, रोजगार, पायाभूत सुविधा, नियमित पाणीपुरवठा या सर्व प्रश्न सुटून सर्वसामान्य जनतेला न्याय मिळत आहे. असे प्रतिपादन यावेळी मा. भास्कर दानवे यांनी यावेळी केले.

या प्रसंगी भाजप जिल्हाध्यक्ष श्री बद्रीनाथ पाठडे, जालना विधानसभा प्रमुख भास्कर दानवे, राजेश राऊत, जालना महानगराध्यक्ष अशोक पांगारकर, अर्जुन गेही, विजय कामड, ज्ञानेश्वर ढोबळे, सुमित सुराडकर, प्रमोद गंडाळ, विमलताई आगलावे, संध्याताई देठे, अरुणाताई जाधव, वसंत शिंदे, सुदर्शन काळे, रवि अग्रवाल, मनोज बिडकर, गोवर्धन कोल्हे, कृष्णा गायके, शिवरज जाधव, तुलजेश चौधरी, रामलाल जाधव, बाबुराव भवर, दत्ता जाधव, सिद्धेश्वर हाजबे, रोहित नलावडे, सुदर्शन काळे, ज्ञानेश्वर पडुळ, आनंद झारखंडे, चेतन देसरडा, माऊली पडुळ, गोपाल चौधरी, निवृत्ती लंके, कैलास उबाळे, राजाभाऊ कळकुंबे, दौलत भूतेकर, मुकेश चव्हाण, यांच्यासह अनेक भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# आमदार लोणीकरांच्या नेतृत्वात मतदार संघाचा खऱ्या अर्थाने विकास झाला - राहुल लोणीकर

## आसनगाव डोणवाडी येथील काँग्रेस कार्यकर्त्यांचा भाजपात प्रवेश



**परतूर । प्रतिनिधी -** आसनगाव ढोनवाडी तालुका परतुर येथील काँग्रेस पक्षाचे सरपंच प्रमोद प्रल्हादराव पाटील यांनी माजी मंत्री तथा विद्यमान आमदार व भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांच्या कामावरती विश्वास ठेवून भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला

यावेळी बोलतांना राहुल लोणीकर म्हणाले की गेल्या दहा वर्षांमध्ये माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी मतदारसंघाचा चौफेर विकास केल्यामुळेच मतदार संघातील अनेक पक्षातील युवा कार्यकर्ते भाजपामध्ये प्रवेश करत असून, कार्यकर्त्यांच्या या प्रचंड शक्तीच्या बळावर येत्या निवडणुकीत पुन्हा एकदा आमदार लोणीकरांच्या रूपाने विकास प्रिय नेतृत्व मतदार संघाला लाभणार असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी सांगितले

पुढे बोलताना ते म्हणाले की गेल्या पाच वर्षापासून विरोधक मतदार संघातील सर्वसामान्य जनतेच्या मदतीला कधीच धावून आले नाहीत मात्र निवडणुकीच्या तोंडावर भुरळ घालण्याचा प्रयत्न करून सर्वसाम ान्यांना भुलवण्याचा प्रयत्न करत आहेत मात्र परतुर विधानसभा मतदारसंघातील मतदार सुज्ञ असून लोणीकरांच्या पाठीमागे ठामपणे उभा असेल असा विश्वास यावेळी त्यांनी बोलून दाखवला.

यावेळी बबनराव झोटे व अनंता पाटील यांच्या पुढाकाराने भारतीय जनता पार्टीमध्ये राहुल भैया लोणीकर यांच्या उपस्थिती मध्ये प्रवेश केला यावेळी प्रमोद पाटील, मोटे, नाटकर ,उज्वल स्वामी माऊली राऊत राजेभाऊ झोटे ,पंडित पाटील, विवेक पाटील यांनी भाजपामध्ये प्रवेश केला याप्रसंगी अशोकराव वाघमारे रवी सोळंके कृष्णा मोटे विठ्ठल खरात अनंता पाटील सतीश पसरकर गणेश चिंचोलकर यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# दहशत निर्माण करणाऱ्याविरुद्ध स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

## धारदार कोयता, फायटर व मोबाईल असा ८ हजार ५0 रुपयांचा मुद्देमाल जप्त

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हयात अवैध धारदार शस्त्रे बाळगणारे व सोशल मिडीया अँपवर अवैध धारदार शस्त्रे तलवार बाळगुन व्हिडीओ अपलोड करणारे इसमांची माहिति घेऊन कारवाई करणे बाबत पोलीस अधिक्षक अजय कुमार बन्सल साहेब यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव व पथकास सुचना दिल्या होत्या. पोलीस निरीक्षक पंकज जाधव, स्थानिक गुन्हे शाखा जालना यांनी स्थागुशाचे पथक तयार करुन कारवाई करण्याबाबत मार्गदर्शन केले होते.

दिनांक १२/१०/२०२४ रोजी सोशल मिडीया इंन्स्टाग्राम अँपवर कोयतासह व्हिडीओ तयार करुन वायरल करुन लोकां मध्ये दहशत निर्माण करणा-या एक विधीसंघर्षग्रस्त बालकासह ईसम नामे सचिन शामराव लोखंडे वय २४ वर्ष रा. दौलतपुर बरड जाफ्राबाद जि. जालना यांचे ताब्यातुन एक धारदार कोयता, एक फायटर व एक मोबाईल असा एकुण ८0५0/- किंमतीचा मुद्देमाल जाफ्राबाद येथुन जप्त करण्यात आला आहे. आरोपी विरुध्द पोलीस ठाणे जाफ्राबाद जि. जालना येथे गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती आज दिनांक १२ शनिवार रोजी दुपारी चार वाजेच्या सुमारास प्रेस नोट द्वारे दिली. सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक



अजय कुमार बन्सल व अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सपोनि योगेश उबाळे, पोउपनि राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार रस्तुम जैवाळ, जगदीश बावणे, सागर बाविस्कर, दिपक घुगे, सतिश श्रीवास सर्व स्थागुशा व संदीप मांटे पोलीस ठाणे सायबर यांनी केली आहे.





**जालना शहरातील जे ई एस महाविद्यालयाच्या प्रांगणात दसरा महोत्सव समितीच्या वतीने रावण दहनाचा कार्यक्रम बहारदार रंगीबेरंगी आतिषबाजीने संपन्न झाला. यावेळी प्रमुख पाहुणे खासदार डॉ कल्याणराव काळे, माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर, घनशाम गोयल, माजी नगराध्यक्ष भास्कर अंबेकर, भाजप जिल्हा उपाध्यक्ष भास्कर दानवे माजी आमदार अरविंदराव चव्हाण, माजी नगराध्यक्ष राजेश राऊत, गणेश महासंघाचे अध्यक्ष अशोक पांगारकर, विनतीत साहनी, राजेश कामड, विष्णू पाचफुले, बबलू चौधरी, जिल्हा पोलीस अधीक्षक अजयकुम ार बंसल, अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, उपविभागीय अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. (छाया अनिल व्यवहारे)**



# डॉल्फिन इंग्लिश स्कूलमध्ये नवरात्री उत्सवात नवदुर्गा देवीचे दर्शन



**परतूर । प्रतिनिधी -** परतुर तालुक्यातील वाटुर फाटा येथील डॉल्फिन इंग्लिश स्कूलमध्ये नवरात्रीनिमित्त नवदुर्गा दर्शन देखावा सादर करण्यात आला यावेळी शाळेतील विद्यार्थिनींनी नवदुर्गांची वेशभूषा सादर केली . तसेच महिषासुर या देत्याचा वध कसा केला यावर छोटी नाटिका सादर केली . नंतर विविध हिंदी मराठी गीतावर दांडिया चा मनसोक्त आनंद विद्यार्थ्यांनी घेतला .

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षिका श्रीमती कुकडे विद्या. श्रीमती सय्यद नसरीन. श्रीमती काळे साधना. श्रीमती उबाळे वंदना श्रीमती वायाळ शारदा. शेळके गजानन इत्यादींनी मेहनत घेतली.

# प्रतिबंधित गुटखा जप्त; एक जण ताब्यात

## ९० लाखांचा मुद्देमाल जप्त; तालुका पोलीस ठाण्याची कारवाई

**जालना । प्रतिनिधी -** राज्यात प्रतिबंधित असलेला गुटखा तालुका जालना पोलिसांनी कारवाई करत जप्त केलाय. या कारवाईत पोलिसांनी एकास ताब्यात घेतले असून २० लाख रुपयांच्या कंटेनर वाहनासहित ८९ लाख ६९ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, शनिवार (दि. ११) रोजी पोलीस निरीक्षक सुरेश उनवणे यांना अंबड रोडवर अपघात झाल्याची माहिती मिळाल्यावरुन अंबड चौफुली पासुन जालना ते अंबड रोडवर सुमारे २०० मिटर अंतराव बालाजी टी. हाऊस समोर जालना येथे अतुल पाटील स.पो.नि., पो.ना./ विष्णु कोरडे, पो.कॉ. लक्ष्माण शिंदे, राम शेंडीवाले, चालक शिवानंद जायभाये असे गेले असता त्या ठिकाणी एक सहा टायर, कंटेनर क्र. HR 63 B 9058 हे उभे असल्याचे मिळुन आले, सदर वाहनातील वाहन चालकास त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव राहुल नानकचंद ऊर्फ कल्लु बालमीकी वय २८ वर्षे, रा. पाठखोरी, ता. फिरोजपुर झिरका, जि. नुहुमेवाद, हरीयाना असे सांगीतले, त्यास विचारपुस केली केली असता त्याने सांगीतले की, एक बाईकवाला माझ्या कंटेनर समोर स्वताःच पडला असल्याने मी माझा कंटेनर थांबवला आहे. पोलीसांनी त्याचे वाहनात काय आहे, या बाबत विचारपुस केली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिल्याने, पोलीसांना संशय आल्याने सदर वाहनास पोलीस ठाणे तालुका जालना येथे घेवुन येऊन पाहनी केली असता त्यात महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला गुटखा पान मसाला, सुगंधित तंबाखु अन्न पदार्थ विक्री करणेस प्रतिबंधीत प्रिमियम राजनिवास सुगंधित पान मसाला व प्रिमियम नङ-०१ जाफराणी जर्दा स्वतः चे व त्याचे वाहन मालकाचे आर्थिक फायद्यासाठी चोरटी विक्री वितरण करणे करीता ताब्यात बाळगुन वाहतुक करतांना मिळुन आला आहे.



कंटेनर क्र. HR 63 B 9058 मध्ये प्रिमियम राज निवास सुगंधीत पान मसाला चे एकुण १२० पोती ज्याची किमत ५५,७५,६८०/- रुपयांचा, प्रिमियम झेड.एल.-०१ जाफरानी जर्दा चे २४ पोती ज्याची किमत १३,९३,९२० रुपये तसेच सहा टायर, कंटेनर क्र. HR 63 B 9058 ज्याची किमत २०,००,०००/- रुपये. असा एकुण ८९,६९,६००/- रुपयांचा मुद्देमाल पकडला आहे. अन्न व औषध प्रशासन यांना माहिती देण्यात आली आहे.

ही कारवाई तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुरेश उनवणे यांच्यासह सपोनी अतुल पाटील, पो.ना. विष्णु कोरडे, पो.कॉ. लक्ष्मण शिंदे, राम शेंडीवाले, चालक शिवानंद जायभाये यांनी केली आहे.

तृतीयपंथी व्यक्तीच्या खून प्रकरण;

# आरोपी २४ तासात जेरबंद

## जालना स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**भोकरदन । प्रतिनिधी -** तालुक्यातील सिरसगाव मंडप शिवारात सोमिनाथ सहाने यांचे शेत गट नं २२४ मधील विहरी मध्ये एक अनोळखी पुरुष जातीचे प्रेत मिळुन आले. प्रेताच्या गळ्यावर तिक्ष्ण हत्याराने वार करुन तिचा खुन करुन त्याचा पुरावा नष्ट करण्यासाठी त्याचे प्रेत विहरीतील पाण्यात टाकले म्हणुन पोलीस ठाणे भोकरदन येथे दिनांक १० ऑक्टो रोजी गुन्हा रजि नं ४५२/२०२४ कलम १०३(१), २३८ भारतीय न्याय संहिता २०२३ प्रमाणे अज्ञात आरोपीतांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्यातील अज्ञात मयत इसमाची ओळख पटविणे व अज्ञात आरोपीचा शोध घेणे बाबत पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल यांनी स्थानिक गुन्हे शाखा जालना यांना सुचना दिल्या. त्यानंतर पोलीस निरीक्षक पंकज जाधव स्थानिक गुन्हे शाखा जालना यांनी स्थानिक गुन्हे शाखा चे एक विशेष पथक नेमले. गुन्ह्यातील अनोळखी पुरुष जातीचे प्रेता संबंधी माहिती घेत असतांना सदर मयत हा मालेगाव जिल्हा नाशिक येथील शेख नवाज शेख रफिक असल्याची प्राथमिक माहिती मिळाली त्या बाबत खात्री केली असता गुन्ह्यातील मयत हा शेख नवाज शेख रफिक वय अंदाजे १७ वर्षे, रा. गुलशेर नगर मालेगाव जि. नाशिक येथील असल्याची खात्री झाली.



नमुद इसम याचे अज्ञात मारेकऱ्या विरुध्द गोपनिय माहितीदार व तांत्रिक विश्लेषणा आधारे माहिती घेत असतांना गुन्ह्यातील मयत शेख नवाज शेख रफिक हा मागील काही दिवसापुर्वी त्याचा छत्रपती संभाजीनगर शहरातील नारेगाव येथे राहणारे मित्रा सह पाहिला असल्याची प्राथमिक माहिती मिळाली. त्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखा जालना येथील पथक छत्रपती संभाजीनगर शहरातील नारेगाव भागात मयत व अज्ञात आरोपी बाबत कसुन माहिती घेत असतांना गुन्ह्यातील मयत शेख नवाज शेख रफिक हा नारेगाव येथे राहणारा त्याचा मित्र अन्वर शहा महंमद शहा यास भेटण्यासाठी छत्रपती संभाजीनगर शहरात आला असल्याची माहिती मिळाली. त्या अनुषंगाने अन्वर शहा महंमद शहा रा. नारेगाव छत्रपती संभाजीनगर याचा शोध घेत असतांना तो ट्रक वर हेल्पर म्हणून मजुरी कामास गेल्याची माहिती मिळाल्याने त्याचा छत्रपती संभाजीनगर व अहमदनगर जिल्ह्यात शोध घेत असतांना तो दिनांक १२/१०/२०२४ रोजी रात्री ०१.१५ वाजता अहमदनगर जिल्ह्यातील कामरगाव शिवारातील हॉटेल महाज्योत येथे मिळुन आला असुन त्याने गुन्हा केल्याची सांगितले आहे. नमुद आरोपी अन्वर शहा महंमद शहा वय १९ वर्षे, रा.नारेगाव छत्रपती संभाजीनगर यास ताब्यात घेऊन पुढील तपास कामी पोलीस ठाणे भोकरदन येथे केले असल्याची माहिती आज दिनांक १२ शनिवार रोजी दुपारी तीन वाजता प्रेस नोटच्या माध्यमातून दिली. ही कारवाई वरीष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, योगेश उबाळे सहा. पोलीस निरीक्षक, पोलीस अमंलदार सॅम्युअल कांबळे, प्रशांत लोखंडे, विजय डिक्कर, सागर बाविस्कर, योगेश सहाने, धिरज भोसले यांनी केली आहे.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.